<u>भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र</u>

(सकाळ)

जा.क्र. ५८२/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांकः—२१/०९/२०१६

**१) व्हॉट्सअपने धार्मीक भावना दुखावल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक १६/०९/२०१६ रोजी ११.०० वा. दर. यातील आरोपीने त्याचे मोबाईल वरुन पवनी पावली या व्हॉट्सअप गृपवर धर्माविरोधी पोस्ट टाकुन तेढ निर्माण करण्याची तसेच शत्रुत्व वाढविण्याचा एकोपा टिकवीण्यास बाधक अशी कृती केली तसेच धर्मगुरु विषयी वाईट शब्द वापरुन धर्मीयांच्या धार्मीक भावना दुखावल्याने फिर्यादीचे लेखी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पवनी येथे कलम १५३ अ, २९५ अ भांदवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. बोरखडे पो. स्टे. पवनी हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**२) ट्रॅक्टरने अवैधरित्या रेती वाहतुक करतांनी मिळुन आल्याने गुन्हा नोंद. :—**

अ) दिनांक २०/०९/२०१६ रोजी ०५.०० वा. दर. यातील फिर्यादी हे नाईटगस्त पेट्रोलींग करीत असता यातील आरोपी क्र. १ ने आरोपी क्र. २ चे सांगण्यावरून यातील बिना नंबरचे ट्रॅक्टर ट्रॉली मध्ये १ ब्रास रेती किमती २,०००/—रू. ची बिना पास परवाना अवैधरित्या भरून रेती घेवुन नेतांनी मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी पोहवा. हुकरे यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन वरठी येथे कलम ३७९,१०९,३४ भादंवी. सहकलम २०६ मोवाका. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ. हलमारे पो.स्टे. वरठी हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

ब) . :—

दिनांक २०/०९/२०१६ रोजी ०४.०० वा. दर. यातील फिर्यादी हे नाईटगस्त पेट्रोलींग करीत असताना यातील आरोपी क्र. १ ने आरोपी क्र. २ चे सांगण्यावरून यातील बिना नंबरचे ट्रॅक्टर चे ट्रॉली क्र. एमएच ३६ जी १४६९ मध्ये १ ब्रास रेती किमती २,०००/—रू. ची ट्रॅक्टर मध्ये बिना पास परवाना अवैधरित्या भरून रेती घेवुन नेतांनी मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी पोउपनी. राऊत यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन वरठी येथे कलम ३७९,१८६,१८३,२२५,(ब),३४ भादंवी. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. राऊत पो.स्टे. वरठी हे करीत आहेत.

**३) शेतातील कॉमटन ग्रिव्हेज कंपनीचा इंजीन चोरी. :—**

दिनांक १९+२०/०९/२०१६ रोजी चे रात्र दर. यातील फिर्यादीचे चांदोरी शेत शिवारात असलेल्या फार्महाऊसचे कोणीतरी अज्ञात चोराने समोरील दाराचा ताला तोडुन आत प्रवेश करून त्यात ठेवलेल्या कॉमटन ग्रिव्हेज कंपनीचा पेट्रोल केरोसीन इंजीन कि. १५,०००/—रू. चा चोरून नेला आहे. असे फिर्यादी आनंदराव तुकारामजी वंजारी वय ७६ वर्ष रा. तकीया वार्ड भंडारा यांचे लेखी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन कारधा येथे कलम ४५७,३८० भादंवी. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ. गौर पो.स्टे. कारधा हे करीत आहेत.

**४) मोटार सायकल ला धडक दिली व दगड मारून जखमी केले . :-**

दिनांक २०/०९/२०१६ रोजी ०९.०० वा. दर. यातील फिर्यादी हा मुलाचे औषधोउपचार करून घरी जात असतांनी यातील आरोपीने मोटार सायकलला धडक दिल्याने फिर्यादीने हटकले असता भांडन करून आरोपीने रस्त्यावरील दगड उचलुन फिर्यादीचे डोक्यावर मारून जखमी केले व डावे हाताच्या अंगठयाला चावुन दुखापत केला. असे फिर्यादी जयदेव गोपाळा तेलमासरे वय ४३ वर्ष रा. पवनी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पवनी येथे कलम ३२४ भादंवी. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोना. कोडवते पो.स्टे. पवनी हे करीत आहेत.

**५) महाविद्यालयात लिपीकांनी विद्यार्थ्याचे प्रवेश फी ची फसवणुक केली. :-**

दिनांक जुलै २०१५ ते आज पावेतो यातील आरोपी हा फिर्यादी यांचे खाजगी महाविद्यालयात लिपीक या पदावर कार्यरत असुन त्याने विद्यार्थाची प्रवेश फी ची रक्कम गोळा करून ती रक्कम विद्यापिठात न भरता परस्पर स्वत:चे आर्थिक फायदयासाठी वापरून अपहार करून फिर्यादीचा विश्वासघात करून तसेच प्रवेश घेणा-या विद्यार्थाची फसवणुक केल्याने असे फिर्यादी सुरेश वासुदेव ठवकर वय ५८ वर्ष रा. भंडारा यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन मोहाडी येथे कलम ४०८,४२० भादंवी. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोउपनी गेडाम पो.स्टे. मोहाडी हे करीत आहेत.

(के.एच.धात्रक)
प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा.
दुरध्वनी.क्र. ९८२३६३७२२०

२१/८/१६

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.